# नामनिर्देशन अर्जाच्या छाननी/मतमोजणीकरीता महत्वाच्या सूचना :-

(१) नामनिर्देशन अर्जाची छाननी करताना उमेदवार स्वत:/ सुचक/ अनुमोदक किंवा प्रतिनिधी जो विशिष्ट मतदार संघाचा मतदार असेल यांपैकी कुणीही एक, कुलसचिव-तथा-निवडणूक अधिकारी यांनी लेखी पत्राद्वारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेली व्यक्ती म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

(२) उमेदवार स्वत: हजर राहु शकत नसल्यास तसा अर्ज कुलसचिव-तथा-निवडणुक निर्णय अधिकारी यांना एक तास अगोदर द्यावा. त्यावर सूचक / अनुमोदक किंवा प्रतिनिधीचे नाव, मतदार यादीतील क्रमांक आणि स्वत:ची व सूचक / अनुमोदक किंवा प्रतिनिधीची स्वाक्षरी असावी. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

(३) उमेदवार स्वत: उपस्थित राहणार असल्यास अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

(४) अर्ज केल्यावर निवडणुक विभागातुन ओळख पत्र देण्यात येईल. (सोबत ओळख पत्रासाठी पासपोर्ट साईज फोटो आणणे) ओळख पत्राशिवाय कुणालाही आत प्रवेश करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

(५) उमेदवाराने नामनिर्देशनासंबंधी आवश्यक ती कागदपत्रे छाननीच्या वेळेस स्वत:जवळ बाळगावीत. (नामनिर्देशन अर्जातील शपथ पत्रामध्ये दिलेल्या पात्रते संबंधी उपस्थितांमधील कुणीही आक्षेप घेतल्यास व संबंधीत कागदपत्रांची मागणी केल्यास त्या उमेदवारास त्याचवेळी कागदपत्र सादर करावे लागतील. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.)

(६) उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी, जो विशिष्ट मतदार संघाचा मतदार असेल आणि लिखित स्वरूपात यथोचितरित्या त्याच्यावतीने प्राधिकृत केलेला असेल, फक्त त्यास मतमोजणीच्या कालावधीमध्ये हजर राहण्यास परवानगी देण्यात येईल. तसेच उमेदवार किंवा त्याने प्राधिकृत केलेला प्रतिनिधी आणि निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्यक्ती / अधिकारी व कर्मचारी व्यतीरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस मतमोजणीच्या ठिकाणापासून पुरेशा अंतराच्या परिघाच्या आत येण्यास अनुमती देण्यात येणार नाही.

(७) प्रवेशपत्र हे अहस्तांतरणीय असेल, उल्लंघन केल्यास उमेदवार अथवा त्याचा प्रतिनिधी कारवाईस पात्र ठरेल.

स्वाक्षरीत/-<br>
(डॉ. दिनेश कांबळे)<br>
कुलसचिव<br>
तथा निवडणूक निर्णय अधिकारी